ARTHA (Commercial Weekly) Poona 4.

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र


प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : १२ नये पैसे
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No.

वर्ष २६ | पुणें, बुधवार तारीख २७ एप्रिल, १९६०









# इतिहासाचें आव्हान

महाराष्ट्र राज्याची निर्मिति हें इतिहासानें दिलेलें आव्हान आहे. हें आव्हान मराठी जनता कशा प्रकारें स्वीकारणार यावर या राज्याचा भविष्यकाळ अवलंबून आहे. आज आपली नवी यात्रा सुरू झाली आहे. नव्या युगांतील ही नवी तीर्थयात्रा आहे. जनतेचें अंतिम कल्याण साधणें हेंच या यात्रेचें उद्दिष्ट होय.

★ जें तत्त्व गांधीजींनीं आपल्या जीवनांत आम्हांला शिकविलें त्या आदर्श ध्येयांची पूर्तता करण्यासाठीं आपण महाराष्ट्रांतील सर्व लोक कटिबद्ध झालों आहोंत.

★ राज्याच्या कारभारांत सर्वसाधारण जनतेला भाग घेणें सोयीचें व्हावें हा भाषिक राज्याच्या मागणीमागील विचार आहे.

★ संयुक्त महाराष्ट्र हें केवळ साध्य नाहीं तर सामाजिक ऐक्य व समानता गांठण्याचें तें साधन आहे.

★ महाराष्ट्राच्या सर्व समस्या भारताच्या राष्ट्रीय भूमिकेवरूनच सोडविण्यांत येतील.

★ महाराष्ट्र राज्याचा राज्यकारभार जात, धर्म, भाषा अथवा प्रदेश या बाबतींत कोणत्याही प्रकारचा भेदभाव न करतां चालविण्यांत येईल.

★ महाराष्ट्राचें सामाजिक मन एकजिनसी झालें पाहिजे.




प्रकाशन संचालक, महाराष्ट्र सरकार, मुंबई

**अर्थ**

बुधवार, ता. १७ एप्रिल, १९६०



संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे

संपादक :
श्रीपाद वामन काळे

# महाराष्ट्र राज्याचें स्वागत

स्वतंत्र महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेनें महाराष्ट्रांतील सर्वांना अत्यानंद होत आहे. महाराष्ट्राच्या अभ्युदयाचीं सर्व सूत्रें आतां आपल्याच हातीं आलीं असून आपल्या त्यागाची, सहकार्याच्या भावनेची, दूरदृष्टीची, समजूतदारपणाची आणि कौशल्यपूर्ण नेतृत्वाची कसोटी लागणार आहे. तक्रारीऐवजीं प्रत्यक्ष कृतीची वेळ आली आहे. महाराष्ट्राच्या उद्धारासाठीं एकदिलाच्या प्रयत्नांची आवश्यकता आहे; उत्पादनवाढीवरच आपलें भवितव्य अवलंबून राहणार आहे. तेव्हां इतर बाबतींत कितीहि मतभेद असले, तरी उत्पादनवाढीच्या आड ते येतां कामा नयेत आणि उत्पादनवाढीस पोषक असें वातावरण निर्माण करण्यांत आलें पाहिजे. सरकार, उद्योगपति, कामगार, शेतकरी, हे सर्व एकाच ध्येयानें प्रेरित आहेत, ह्याची प्रचीति सर्वांना येणें अगत्याचें आहे. महाराष्ट्र राज्याचे विविध क्षेत्रांतील पुढारी योग्य मार्गदर्शन करून महाराष्ट्राचें महत्त्व आणि लौकिक वाढवतील अशी आशा आहे. श्री. यशवंतराव चव्हाण ह्यांच्या नेतृत्वाचा लाभ महाराष्ट्रास मिळाला आहे; त्यांच्या दूरदृष्टीचे आणि समतोल वृत्तीचे महाराष्ट्रांत अनुकरण केलें जावो.

## बँकांच्या तपासणीमुळें बँकिंग सुधारलें

### रिझर्व्ह बँकेची शुश्रूषेची योजना

"हिंदी बँकिंगच्या आजच्या सुस्थितीचें मुख्य कारण, बँकांची कार्यक्षम रीतीनें केली जाणारी तपासणी, हेंच आहे." असे उद्‌गार रिझर्व्ह बँकेचे माजी गव्हर्नर श्री. बी. रामराव ह्यांनीं मद्रास येथील आपल्या एका भाषणांत काढले. बँकांच्या तपासणीस पद्धतशीर प्रारंभ झाल्यानंतर बँका बुडण्याच्या प्रकारास प्रभावी आळा बसला आहे. गेल्या सात-आठ वर्षांत ज्या बँकांचें काम बंद पडलें, तें रिझर्व्ह बँकेनेंच मुद्दाम बंद पाडलें; बँकिंग कंपन्यांच्या कायद्याच्या तरतुदी पाळणें त्या बँकांना अशक्य झालें होतें. युद्धापूर्वीच्या आणि युद्धकाळांत कितीतरी बँकांची स्थापना झाली, पण १९३९ ते १९४९ ह्या मुदतींत ५८८ बँका बुडाल्या ! ह्या आपत्तीवर उपाय योजण्यास रिझर्व्ह बँकेजवळ त्या वेळीं प्रभावी अधिकार नव्हते. ज्यावर तात्काळ उपाय योजायला हवेत, अशा दोषांच्या निराकरणासाठीं रिझर्व्ह बँकेला वेळोवेळ कायदेशीर अधिकार देण्यांत आले, ते बहुतेक सर्व बँकिंग कंपन्यांच्या कायद्यांत पुढें समाविष्ट करण्यांत आले. कोणत्याहि बँकेची केव्हांहि तपासणी करण्याचा अधिकार रिझर्व्ह बँकेस देण्यांत आला, तो हिंदी बँकिंगला उपकारक ठरला. परवाना देण्यापूर्वी चौकशी, शाखा उघडण्याची पात्रता, एकत्रीकरण, रिझर्व्ह बँकेच्या सूचनांची अंमलबजावणी, इत्यादि कारणांसाठी बँकांच्या तपासणीस प्रारंभ झाला. बँकांना परवाना देण्यापूर्वी रिझर्व्ह बँक परवाना मागणारी बँक आपल्या ठेवीदारांच्या सर्व ठेवी परत देऊं शकेल किंवा नाहीं, ह्याची चौकशी करूं लागली; त्यासाठी बँकांचे हिशेब तपासूं लागली. आणि कारभाराची छाननी करूं लागली; बँक कितीहि मोठी, जुनी किंवा प्रतिष्ठित असो, तिला रिझर्व्ह बँकेच्या तपासणीस तोंड देणें भागच पडलें. प्रत्येक बँकेची वार्षिक तपासणी व्हावी, हा रिझर्व्ह बँकेचा अंतिम उद्देश होता. बँकांचा कारभार बिघडण्यापूर्वींच त्यांना रिझर्व्ह बँकेचें मार्गदर्शन मिळावें, हा हेतु साध्य झाला आहे. श्री. रामराव ह्यांनीं सांगितलें कीं, रिझर्व्ह बँकेनें किती तरी बँकांची दीर्घकाळ शुश्रूषा करून त्यांची प्रकृति सुधारलेली आहे. परवान्यास बँकांना पात्र ठरविण्याच्या कसोट्या मुद्दामच उच्च दर्जाच्या राखण्यांत आल्या आहेत; म्हणजे त्यांना उतरण्याच्या प्रयत्नांत बँकांचा कारभार आपोआपच सुधारतो. मार्च, १९६० अखेर रिझर्व्ह बँकेनें फक्त ४७ शेड्यूल्ड बँकांना आणि १५ बिगर शेड्यूल्ड बँकांना परवाना दिला आहे. ह्यावरून, अद्याप रिझर्व्ह बँकेच्या शुश्रूषेखाली बहुसंख्य बँका आपली प्रकृति सुधारूं पहात आहेत, हें स्पष्ट होईल. परवाना मिळालेल्या ६२ बँकांकडे सर्व बँकांकडील ठेवींपैकी ९४% ठेवी आहेत; ह्यावरून हिंदी बँकिंगचा केवढा तरी भाग सुरक्षित रीतीनें प्रगति करीत आहे, हें दिसून येईल.

## बँकांच्या राष्ट्रीयीकरणाची मागणी

हैद्राबाद येथें अखिल भारतीय बँक-नोकरांची परिषद चार दिवस चालू होती. हैद्राबादच्या महापौरांनीं ह्या परिषदेचें उद्‌घाटन केलें. भारताच्या निरनिराळ्या भागांतून ५०० प्रतिनिधी परिषदेसाठी उपस्थित होते. लोकसभेचे सदस्य व बँकनौकर संघटनेच्या आंध्रराज्यांतील शाखेचे अध्यक्ष श्री. राज बहादुर गौर ह्यांनीं स्वागतपर भाषण केलें. ते म्हणाले कीं, बँकांचें राष्ट्रीयीकरण होणें अगत्याचें आहे. बँकांचें राष्ट्रीयीकरण झालें तरच देशांत असलेला शिलकी पैसा बँकांतून ठेवींच्या रूपानें गोळा होऊं शकेल. नाहींतर असा पैसा गोळा होण्याच्या कामीं फार अडथळे येतील. बँकांकडे ठेवींच्या रूपानें शिलकी पैसा जमा झाला तर त्याचा उपयोग देशांतील उत्पादक उद्योगधंद्यांचा विस्तार करण्याच्या कामीं करतां येईल. कांहीं थोड्या बँकांत पैशाचें केंद्रीकरण होऊं द्यावयाचें नसेल तर हाहि हेतु राष्ट्रीयीकरणामुळें साधूं शकेल. देशाच्या विकासासाठी आर्थिक कार्यक्रम आखण्यांत येत आहेत. अशा वेळीं पैशाचा पुरवठा करणाऱ्या सर्व प्रकारच्या संस्थांचा सार्वजनिक मालकीच्या विभागांत समावेश केला जाणें आवश्यक आहे. खाजगी मालकीच्या बँका ज्या ठिकाणीं सहज नफा होईल अशा ठिकाणीं शाखा उघडण्यास आतुर असतात. त्यामुळें परिणाम असा

झाला आहे कीं, मोठ्या शहरांतून बँकांचें केंद्रीकरण झालें आहे. अर्थातच ग्रामीण भागांकडे बँकांचें दुर्लक्ष झालें आहे. बँक-नोकरसंघटनेचे अध्यक्ष श्री. काकर ह्यांनीं आपल्या भाषणांत असें सांगितलें कीं, पंचवार्षिक योजनांच्या अंमलबजावणीसाठी बँकांचें राष्ट्रीयीकरण होणें ज़रूर आहे.

### जायंट टायरांचें उत्पादन

देशाच्या निरनिराळ्या भागांत जायंट टायरच्या किंमती वाढल्या असल्याबद्दल कांहीं तक्रारी सरकारकडे आलेल्या आहेत. मोटारधंद्यासाठी लागणाऱ्या अशा टायरांचें उत्पादन १९५६ मधील ६·४ लक्षावरून वाढून १९५९ मध्यें ८·१ लक्षावर गेलें आहे. तथापि वाहतुकीच्या गरजांत बरीच वाढ झाल्यानें प्रतिवर्षी ७५,८०० जायंट टायरांची टंचाई अद्यापहि भासते. उत्पादन वाढ करण्यासाठी चालू कारखान्यांना आणि चार नव्या योजनांसाठी परवाने देण्यांत आलें असल्यानें दरवर्षी २५ लक्ष टायर तयार होऊं लागतील व पुढील दोन–तीन वर्षांत देश स्वयंपूर्ण बनेल, इतकेंच नव्हें तर निर्यातहि करूं लागेल. तसेंच टायरांची आणखी आयात करण्यास परवानगी द्यावी किंवा कसें याचाहि सरकार विचार करीत आहे.

### नासिक जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लिमिटेड
#### नासिक रोड शाखेचें उद्घाटन

बुधवार दि. २७ एप्रिल १९६० रोजीं दुपारीं ४ वाजतां माननीय श्री. जी. एम्. लाड, मॅनेजिंग डायरेक्टर, मुंबई राज्य सहकारी बँक लिमिटेड, मुंबई यांचे शुभ हस्तें होणार आहे.

### साखरेवरील नियंत्रणें काढण्याची मागणी

मुंबई येथील साखर-व्यापारी संघटनेची १५ वी वार्षिक सभा नुकतीच झाली. असोसिएशनचे अध्यक्ष श्री. परशराम पेरूमल ह्या प्रसंगीं केलेल्या भाषणांत म्हणाले कीं भारत सरकारनें साखरेचें उत्पादन वाढण्यासाठी प्रलोभनें ठेवलेलीं आहेत. सरकारचें साखरेबाबतचें हें धोरण स्वागतार्ह आहे. कारण ह्या धोरणामुळें साखरेचें उत्पादन वाढविण्याच्या कामीं यश आलेलें आहे. साखरेच्या पुरवठ्याच्या बाबतींत आतां असें म्हणतां येईल कीं आणीबाणीची परिस्थिति भूतकालांत जमा झाली आहे. साखरेच्या टंचाईचा काळ आतां कधींच येणार नाहीं असें विश्वासपूर्वक म्हणण्यास हरकत नाहीं. सध्यां साखरेच्या वांटपावर नियंत्रणें आहेत. परंतु उत्पादन वाढल्यामुळें पुरवठाहि वाढला आहे. तेव्हां आता सरकारनें नियंत्रणें रद्द करण्यास हरकत नाहीं. चालू हंगामाच्या बाबतींत जी ताजी माहिती मिळाली आहे त्यावरून ह्या हंगामांत साखरेचें उत्पादन २४ लाख टनांच्या आसपास जाईल असें दिसतें. साखरेच्या उद्योगधंद्याच्या बाबतींत हा उच्चांकच आहे. १९५९–६० सालीं जास्तींत जास्त २१·५ लाख टन साखर खपली असावी असा अंदाज आहे. मागील हंगामांतील शिल्लक साखर जमेस धरून पुढील हंगामाच्या प्रारंभीं ४·५ लाख टन साखर शिल्लक राहील. ह्याचा अर्थ असा कीं, टंचाईची परिस्थिति आतां राहिलेली नाहीं. टंचाईच्या परिस्थितींत साखरेवर नियंत्रणें ठेवणें न्याय्य ठरेल. पण, नियंत्रणांमुळें टंचाईची परिस्थिति निवळेल असें मानतां येत नाहीं; उलट, गेल्या कांहीं वर्षांत साखर व्यापाराला सरकारच्या धोरणामुळें अडचणी मात्र सोसाव्या लागल्या.

कोयनेच्या पाण्यानें महाराष्ट्रांतल्या हजारों एकर जमिनीला नवजीवन लाभणार आहे.

कोयनेच्या विजेनें महाराष्ट्रांतलीं हजारों खेडीं उजळून निघणार आहेत.

पण हें भवितव्य साकार करण्यासाठीं तुमच्या आमच्या एकजुटीची, कल्पक परिश्रमांची आणि सहकार्याची गरज आहे.

धनधान्यसंपन्न महाराष्ट्राच्या निर्मितीसाठीं गेलीं चेचाळीस वर्षें सतत सेवा–सहकार्य करीत असलेली भारतांतील अग्रेसर सहकारी बँक....

## पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

लक्ष्मी रस्ता, पुणें २.

★ भाग भांडवल पंचवीस लाख
★ खेळतें भांडवल चार कोटींचे वर
★ ठेवी अडीच कोटींहून जास्त
★ पुणें जिल्हाभर विखुरलेल्या एकवीस शाखा आणि निश्चिंत ठेवणारे (सेफ डिपॉझिट व्हॉल्ट्स्)

तार : 'सेकोबँक'
फोन : १४८३

शं. वि. संत,
कार्यकारी संचालक.

# विविध माहिती

**सोलापूर जिल्ह्यांतील आदर्श गांव**—सोलापूर जिल्हा विकास बोर्डानें १९५९ सालीं आदर्श खेडेगांवाविषयीं एक स्पर्धा ठेवली होती. ह्या स्पर्धेंत सोलापूर जिल्ह्यांतील मोडनिंब गांवाला आदर्श खेडें म्हणून २५० रुपयांचें बक्षीस मिळालें आहे. ह्या खेडेगांवांतील लोकांनीं विकासकार्यासाठी मिळणाऱ्या मदतीचा जास्तींत जास्त उपयोग करून घेतलेला आहे.

**योगासनांचें मूल्यमापन**—मध्यवर्ती सरकारच्या शारीरिक शिक्षण सल्लागार-बोर्डानें योगासनांच्या रोगपरिहारक उपयोगाचें मूल्यमापन करण्यासाठीं एक कमिटी नेमण्याचें ठरविलें आहे. त्याचप्रमाणें योगविषयक संस्थांच्या शास्त्रशुद्ध वाढीविषयीं मार्ग सुचविण्याचें कामहि कमिटीकडे सोपविण्यांत आलें आहे. अशा संस्थांना कमिटी भेट देईल.

**अमेरिकन मंडपाची देणगी**—दिल्ली येथें भरविण्यांत आलेल्या जागतिक शेती-प्रदर्शनांतील अमेरिकेचा मंडप अमेरिकेनें भारताला भेट म्हणून दिला आहे. हा मंडप फारच प्रेक्षणीय असून तो बांधण्यासाठी १२ लाख रुपये खर्च आला होता. मंडप बांधण्यासाठी ३,००० कामगारांना तीन महिने खपावें लागलें होतें.

**'दक्षिण काशी' येथें धर्मशाळा** — महबुबनगर जिल्ह्यांतील आत्मपूर ह्या ठिकाणीं एक मोठी धर्मशाळा बांधण्याचें आंध्र प्रदेश सरकारनें ठरविलें आहे. ह्या धर्मशाळेसाठी ५०,००० रुपये खर्च येणार आहे. आत्मपूर हें ठिकाण इतिहासांत फार प्रसिद्ध असून त्याला 'दक्षिण काशी' अशीहि संज्ञा आहे.

**म्हैसूर राज्यांतील दारूबंदी**—म्हैसूर राज्य सरकारनें राज्यांतील दारूबंदीची व्याप्ति हळूहळू वाढविण्याचें धोरण स्वीकारलें आहे. त्याप्रमाणें १ जुलैपासून म्हैसूर जिल्ह्यांत दारूबंदी करण्यांत येणार आहे. मात्र म्हैसूर शहराचा समावेश दारूबंदी विभागांत नाहीं. दारूबंदीमुळें राज्य सरकारला दरसाल २० लाख रुपये उत्पन्नाला मुकावे लागेल.

**संततिनियमनासाठीं गोळ्या**—औषधें तयार करणाऱ्या एका अमेरिकन कंपनीनें संततिनियमन साध्य करणाऱ्या गोळ्या तयार केल्या आहेत. १,००० स्त्रिया ह्या गोळ्यांचा वापर सुमारें ४ वर्षे करीत आहेत व त्यांचा अनुभव चांगला आहे असा कंपनीचा दावा आहे. अमेरिकन सरकारच्या संबंधित खात्याकडे गोळ्यांना कंपनीतर्फे मंजुरी मागण्यांत आली आहे.


## यशवंत महाराष्ट्र

भारतीय राज्यसत्तेची लोकशाहीवरील निष्ठा व्यक्त करणारी सुमंगल घटना म्हणजे द्विभाषिकाच्या विभाजनांतून महाराष्ट्राच्या नवीन राज्याचा होणारा उदय.

शेतीप्रधान भारतांतील या नव्या महाराष्ट्राचें नेतृत्व माननीय श्री. यशवंतरावजी चव्हाण यांचेसारख्या शेतकऱ्याचे मुलाकडे असल्यानें परस्पर प्रेम, सहकार, सद्भावना, राष्ट्रीयवृत्ति आणि सतत उद्योग या सद्गुणांची जोपासना महाराष्ट्रांत वाढीस लागणार असल्यानें भारताचा मेरूमणी ठरो अशी सदिच्छा या सुप्रभातीं महाराष्ट्र आनंदानें न्हाऊन निघत असतांना आम्ही व्यक्त करीत आहोंत.

शेतकऱ्यांच्या मालकीचा आणि शेतकऱ्यांनीं चालविलेला
भारतांतील आदर्श साखर कारखाना—

★ दि सासवड माळी शुगर फॅक्टरी लि. माळीनगर ★



PRATIBHA 9



[illegible] नवीन [illegible] साडी [illegible]
[illegible] अद्यावत् डिझाइनचं कापड पाहिलं की, सहजच उद्गार निघतात, 'आठवले शहाडे यांच्याच दुकानांतील खरेदी दिसते.'

आकर्षक कापडाचे
पुण्यांतील प्रमुख केंद्र

आठवले शाहाडे

कुंटे चौक, लक्ष्मी रोड, पुणे-२

### एअर-इंडियाच्या विमानांना शिखरांचीं नांवें

एअर-इंडियाच्या नव्या चार प्रचंड बोइंग विमानांना हिमालयाच्या शिखरांचीं नांवें देण्यांत येणार आहेत:–एव्हरेस्ट, कांचनगंगा, अन्नपूर्णा आणि नंदादेवी. हीं विमानें ४०,००० फूट उंचीवरून उड्डाण करतात; म्हणजे एव्हरेस्टवरून जातांना तीं विमानें आणि सर्वोच्च शिखर ह्यांत ११,००० फूट अंतर राहील.

### पोस्ट ऑफिस सेव्हिंग्ज बँका क्लिअरिंग हाउसच्या सभासद होणार

ज्या ज्या ठिकाणीं क्लिअरिंग हाउसची सोय आहे, त्या त्या ठिकाणीं पोस्ट ऑफिस सेव्हिंग्ज बँकेला क्लिअरिंग हाउसचे सभासद करून घेतले जावे, असा निर्णय घेण्यांत आला आहे. त्यामुळें, पोस्ट ऑफिस सेव्हिंग्ज बँकेवर काढलेल्या चेकची वसुली इतर शेड्यूल्ड बँकांमार्फत करतां येईल. ज्या ठिकाणीं क्लिअरिंग हाउस नसेल, त्या ठिकाणीं अशा चेकची वसुली पोस्ट ऑफिस सेव्हिंग्ज बँकेप्रमाणें रिझर्व्ह बँक किंवा स्टेट बँक ह्यांचे द्वारांहि करतां येईल.

### विद्यापीठांत प्रवेशासाठीं १७ वर्षें पुरीं असावींत

विद्यापीठांत दाखल होणाऱ्या विद्यार्थ्यांचें वय १७ पुरीं वर्षें किमान असावें, असें विद्यापीठ अनुदान मंडळानें ठरविलें आहे. अर्थात्, तें तात्काळ अंमलांत आणणें कठीण आहे; तेव्हां तूर्त, पहिली पायरी म्हणून किमान १६ पुरीं वर्षें सक्तीचीं करावीं, असें मंडळानें सुचविलें आहे. कित्येक विद्यापीठें फार कमी वयाच्या मुलांना प्रवेश देतात; त्यांची बौद्धिक व इतर दृष्टीनें पुरी वाढ झालेली नसते आणि त्यांना उच्च शिक्षणाचा पुरा फायदा घेतां येत नाहीं, असें ह्या शिफारशीचें समर्थन आहे.

### कातडी पायतणांची निर्गत

१९५९ च्या पहिल्या ११ महिन्यांत २·१७ कोटी रुपये किंमतीच्या २२ लक्ष, ७० हजार कातडी पायतणांची निर्गत झाली. तिसऱ्या पंचवार्षिक योजनेंत ४० ते ५० लक्ष पायतणांच्या निर्गतीचें लक्ष्य ठरविण्यांत आलें आहे.

### हिंदी टंकलेखक व लघुलेखक

हिंदी टंकलेखक आणि लघुलेखक शिकवून तयार करण्यासाठीं दिल्ली येथें दोन आणि मुंबई, कलकत्ता व मद्रास येथें प्रत्येकी एक अशीं केंद्रें स्थापन करण्यांत येणार आहेत. त्यांतून दरसाल २००० हिंदी टंकलेखक व ५०० हिंदी लघुलेखक तयार होऊन बाहेर पडतील.

### माल वाहतुकीच्या भाड्यापोटीं परदेशी बोट कंपन्यांस ७७॥ लक्ष रुपये दिले

आयात मालाच्या वाहतुकीच्या भाड्यापोटीं परदेशी बोट कंपन्यांस १९५८ मध्यें साडेसत्याहत्तर लक्ष रुपये देण्यांत आले. तथापि हा आंकडा कच्चा आहे. १९५४, ५५, ५६ व ५७ या चार वर्षांचे हे आंकडे अनुक्रमें ३४·४७, ४३·०६, ६६·५७ व ९४·९४ लाख रुपये असे होते. १९५४ ते ५८ या कालावधींत याप्रमाणें भाडें देण्यांत आलेल्या कंपन्या इंग्लंड, अमेरिका, नॉर्वे, डेन्मार्क, स्वीडन, नेदरलँड्स, जपान, पोलंड, जर्मनी व इटली या देशांच्या होत्या.

माधवाश्रम लि. भोजनाची व राहण्याची उत्कृष्ट सोय.
विवाहकार्यांची संपूर्ण व्यवस्था. गिरगांव, मुंबई ४.




'अर्थ' ग्रन्थमाला
१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली ४ सहकार

प्रियजनांना द्यावयाची भेट कशी असावी ?
सतत ताजा आनंद देत राहणारी !
श्री. वा. काळे ह्यांचीं कौटुंबिक पुस्तकें
कण आणि क्षण रु. १=५०
पुढे पाऊल रु. १=००
तुमचें स्थान कोणतें ! रु. १=००
ही भेट देऊन आपली गुणज्ञता व्यक्त करा.

शाखा :– फोर्ट, दादर, वरळी, माहिम, वडाळा, पुणें, बेळगांव
महिला शाखा सारस्वत बँकगृह गिरगांव मुंबई ४.

नव-महाराष्ट्राची — — औद्योगिक प्रगति

प्रगतीपथावरील औद्योगिक महाराष्ट्रास आर्थिक साहाय्याची आवश्यकता आहे. सारस्वत बँकेनें वेळोवेळी अनेक लहानसहान धंद्यांना आर्थिक मदत करून या कार्यास हातभार लावलेला असून, आजही ठेवीदारांच्या बचतीचा उपयोग उद्योगधंद्यांच्या वाढीसाठी करण्याकडे विशेष कटाक्षानें लक्ष दिलें जातें.
—: विशेष माहितीसाठीं लिहा :—

सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक, लि.
स्थापना १९१८ गिरगांव, मुंबई ४. टेलिफोन २७०८४

## हिंदुस्तान लिव्हरची वार्षिक सर्वसाधारण सभा

### रस्तावाहतुकींत सुधारणा होण्याची आवश्यकता

मुंबई येथें गेल्या ता. ६ एप्रिल रोजीं हिंदुस्तान लिव्हर लिमिटेड या कंपनीची वार्षिक साधारण सभा भरली. ह्या सभेंत भाषण करतांना कंपनीचे चेअरमन श्री. एस. एच. टर्नर यांनीं आपल्या धंद्यांतील वाहतुकीच्या प्रश्नांबाबतचा आढावा घेतला. कंपनीला मालाची ने–आण करतांना हजारों स्थलांतरांचा विचार करावा लागतो. कच्चा माल कारखान्यांत आणावयाचा असतो आणि कारखान्यांतील तयार माल हिंदुस्तानभर कानाकोपऱ्यांत रवाना करावयाचा असतो. कंपनीचा माल मागविणारे ११,०७० व्यापारी असून वर्षांतून सरासरी बारा वेळां या प्रत्येकाची खरेदी होत असते. १९५९ सालीं या सर्वांच्या खरेदीचा एकूण आंकडा ४४ कोटी रु. पर्यंत जाऊन पोंचला होता. याखेरीज ८५,००० टन वनस्पति तेलें व ६०,००० टन गळिताचीं धान्यें कंपनीच्या कारखान्यांत आणावीं लागलीं. ही सर्व ने–आण करण्याकरितां कंपनीला तिच्या गेल्या वर्षीच्या स्थूल नफ्याच्या सुमारें निम्म्या-इतकी रक्कम वाहतुकीपायीं खर्चावी लागली. मालाचें स्वरूप, त्याचें पॅकिंग, माल पाठवावयाचें ठिकाण, तो जाण्यासाठी लागणारा वेळ, खर्च आणि माल ज्यांना पाठवायचा त्यांची सोय वगैरे सर्व गोष्टी विचारांत घेऊन त्या दृष्टीनें सोयीस्कर अशा सर्व वाहतूक साधनांचा वापर कंपनी करीत असते. गेल्या एका दशकांत तयार मालाच्या रवानगीबाबत कंपनीनें दोन नवे उपक्रम सुरू केले.

एक रस्तावाहतुकीच्या उपयोगाचा आणि दुसरा डेपो स्थापनेचा. १९५० सालीं बहुतेक सारा तयार माल आगगाडीनें पाठविला जात असे पण आज सुमारें ५० टक्के माल रस्ता वाहतुकीनें जात असतो. माल–वाहतुकीचा काल यामुळें २१ दिवसांवरून ५ दिवसांपर्यंत कमी करतां आला आहे आणि अशा प्रकारें माल मार्गावर असल्या अवधींत हें भांडवल निष्क्रियावस्थेंत पडून राहण्याचें टाळतां आलें आहे. आगगाडीची वाहतूक अनेक तऱ्हांनीं पूर्वीपेक्षा सुधारलेली असली आणि अजूनहि कच्च्या मालांपैकी अधिकांश भाग व तयार मालापैकी निम्मा भाग आगगाडीनें जात असला तरी रस्तावाहतुकीला एकंदर वाहतूक–योजनेंत निश्चित महत्त्व प्राप्त झालें आहे. रस्तावाहतूक सुधारण्याकरितां अवश्य तें सर्व साह्य सरकारकडून मिळावें अशी विनंती श्री. टर्नर यांनीं केली. विशेषतः रस्ता–वाहतूक पुनर्घटनेच्या चौकशीसाठी नेमलेल्या मसानी कमिटीच्या शिफारसी त्वरित अंमलांत आणाव्या असें त्यांनीं आग्रहानें सांगितलें. कंपनीच्या वितरणव्यवस्थेंतहि नवे डेपो उघडून सुधारणा करण्यांत आली आहे. १९५० सालीं जेथें ४ डेपो होते, तेथें आतां ५१ डेपो उघडले आहेत.

रस्तावाहतूक व रेलवाहतूक या दोन्ही प्रकारें होणारा खर्च गेल्या कांहीं वर्षांत वाढला आहे. वाहतुकीवर कर बसवून सरकारी उत्पन्नाचें एक साधन म्हणून त्याचा उपयोग करून घेण्याच्या सरकारी धोरणाला लगाम घालण्याची वेळ खचित आली आहे असें सांगून श्री. टर्नर पुढें म्हणाले, कीं ज्या वाहतुकीवर कर बसविला असेल त्या वाहतुकीच्या साधनांत सुधारणा घडवून आणण्यासाठी या जादा कराच्या उत्पन्नाचा विनियोग करण्यांत यावा. रस्तावाहतूकसुधारणाकरितां योजलेली रक्कम फारच अल्प आहे आणि जी कांहीं अल्पस्वल्प सुधारणा करण्यांत येत आहे तींतहि निकडीची भावना असल्याचें प्रत्ययास येत नाहीं.

रेलवाहतुकीसंबंधांत बोलतांना, गेल्या दशकांत रेल्वेनें जी प्रगति केली त्याबद्दल श्री. टर्नर यांनीं रेल्वेला धन्यवाद दिले पण त्याबरोबरच अनेक गोष्टींत रेल्वेला अजून सुधारणा करतां येईल असेंहि त्यांनीं निदर्शनास आणलें. विशेषतः अन्न-पदार्थांची शीतपेट्यांतून वाहतूक होण्याची व्यवस्था व्हावी आणि अनेक परदेशांत ज्या प्रकारची कन्टेनर सर्व्हिसची सोय आहे अशी ती येथेंहि सुरू करावी अशी सूचना त्यांनीं केली. स्थानिक वाहतूक कर, ऑक्ट्रॉय कर, यांची योग्य तत्त्वावर पुनर्मांडणी होण्याची आवश्यकता त्यांनीं प्रतिपादली. कारण आजच्या या करांतील गोंधळामुळें रस्तावाहतुकीच्या प्रगतीला अडथळा येत आहे; तसेंच बंदरांतीलहि सोयींबाबत सुधारणा होणें अवश्य आहे. विशेषतः वनस्पति तेलें आगबोटींतून मोठ्या सांठ्यानें नेण्या–आणविण्याची व्यवस्था व्हावी अशी सूचना त्यांनीं केली.


॥ श्री ॥

# दि बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लि., पुणें २.

मंगल देशा, पवित्र देशा, महाराष्ट्र देशा ।
प्रणाम घ्यावा माझा हा श्रीमहाराष्ट्र देशा ॥ —गोविंदाग्रज

**महाराष्ट्र राज्याचें सहर्ष स्वागत करून**

**— म हा रा ष्ट्रा चा —**

सर्वांगीण विकास व भरभराट होवो अशी या मंगलप्रसंगीं शुभेच्छा प्रकट करीत आहोंत.

**शुभ्र दाणेदार साखरेचे**

आणि

रेक्टिफाईड व डिनेचर्ड स्पिरीटचे उत्पादक व व्यापारी.

के. त्र्यं. चांफेकर, B. E., A. M. I. E. मॅनेजर.

शं. ल. लिमये, B. Sc., LL. B., अध्यक्ष.

## महाराष्ट्रांतील बंदरांच्या विकासाचा कार्यक्रम

रस्ते हे जर उत्कर्षाचे राजपथ असतील तर बंदरें हीं त्यांचीं द्वारें होत. समुद्र, रेल्वे, व अंतर्गत मार्ग यांना जोडणारा हा महत्त्वाचा दुवा आहे. देशाच्या सुरक्षिततेच्या दृष्टीनें बंदरांना विशेषच महत्त्वाचें स्थान आहे. आपल्या राज्याला अदमासें ३२० मैल लांबीचा, समुद्रकिनारा लाभला असून, या भागांत वाहतुकीला योग्य अशा खाड्या व बंदरें आहेत. मुंबई हें आंतरराष्ट्रीय महत्त्वाचें बंदर असून, तें मोठ्या जहाजांतून मालाची चढउतार करण्यासाठी अतिशय सोयीचें आहे. या किनाऱ्यावर एकूण ४९ बंदरें आहेत. यांपैकीं कांहीं बंदरांत बोटी धक्क्यापर्यंत येण्याच्या सोयी नाहींत. तसेंच, त्या बंदरांतून २० ते २०० टन एवढ्याच मालाची चढउतार करतां येते.

मोरणा, करंगा, दाभोळ, जयगड, रत्नागिरी, मालवण व वेंगुर्लें हीं बंदरें मालाच्या वाहतुकीच्या दृष्टीनें महत्त्वाचीं आहेत. वेंगुर्लें या बंदरांतून सरासरी १ लक्ष टन मालाची वाहतूक होते. मोरणा या बंदराचा क्रमांक त्यानंतर लागतो. या बंदरांतून ४६,००० टन मालाची वाहतूक केली जाते. इतर बंदरांतून साधारणतः २०,००० ते ३३,००० टन या दरम्यान मालाची वाहतूक होत असते. संगमेश्वर व खारेपाटण या दोन शहरांचा व्यापार अनुक्रमें जयगड व विजयदुर्ग या बंदरांमार्गे चालतो. आणि हीं बंदरें बारमाही असून, त्यांत २०० टन एवढीं मालवाहू जहाजें येऊं शकतात. तसेंच, रत्नागिरी, देवगड, मालवण व वेंगुर्लें हीं महत्त्वाचीं बारमाही बंदरें आहेत. किनाऱ्यालगत पश्चिमघाट समुद्रपट्टीला लागूनच पसरला असून सबंध भाग हा रस्त्यांनीं जोडलेला आहे.

दाभोळखाडी ही वाशिष्ठी नदी समुद्राला जेथें मिळते तेथपासून चिपळूणपर्यंत ३० मैल लांब आहे. सध्यां, २७ मैलांवर असलेल्या गोवलकोटा या गांवापर्यंत १५० टनांचीं जहाजें येऊं शकतात. लहान बोटी मात्र चिपळूणपर्यंत जाऊं शकतात. कोयना योजनेच्या पहिल्या टप्प्याचें बांधकाम पूर्ण झाल्यानंतर नदीला फार मोठ्या प्रमाणांत पाण्याचा पुरवठा होईल. पाण्याचा सतत पुरवठा झाल्यामुळें, ही खाडी चिपळूणपर्यंत वर्षभर वाहतुकीला उपयोगीं पडूं शकेल.

देवगड हें बंदर रत्नागिरीच्या दक्षिणेस ४० मैलांवर देवगड खाडीच्या मुखाशीं वसलेलें आहे. देवगडची खाडी ३५ मैल लांब असून देवगडनंतर ती निमूळती होत जाते. समुद्राला जेव्हां फार भरती येते तेव्हां या खाडीमध्यें १६ मैल दूर असलेल्या खर्डा या गांवापर्यंत लहान बोटी येऊं शकतात.

रेडी हें बंदर वेंगुर्ल्याच्या दक्षिणेस रेडी खाडीच्या मुखावर व मुंबई गोवा यांच्या सरहद्दीवर वसलेलें आहे. येथील लोखंडाची निर्यात करण्यासाठी नुकताच या लहान बंदरावर धक्का बांधण्यांत आला आहे.

स्वातंत्र्य मिळण्यापूर्वी, या लहानसहान बंदराकडे लक्ष देण्यांत आलें नाहीं आणि त्यामुळें या बंदरांची स्थिति अतिशय खालावली.

कुलाबा व रत्नागिरी या जिल्ह्यांतील लहान लहान बंदरें हीं बंदरालगतच्या भागांना विशेष महत्त्वाचीं आहेत. कारण त्यांचा उपयोग मुंबईला मालाची व प्रवाशांची वाहतूक करण्यासाठीं होत असतो. या जिल्ह्यांमध्यें किनाऱ्याजवळून रेल्वेचा मार्ग जात नसल्यामुळें, सडकांनीं प्रवास करणें गैरसोईचें व खर्चाचें आहे. या दृष्टीनें या लहान बंदरांच्या विकासाचें एक विशिष्ट महत्त्व आहे. रत्नागिरी, दाभोळ, हर्णे, मालवण व देवगड या पांच बंदरांतून दरवर्षी ५.५० लक्षांहून अधिक उतारूंची वाहतूक होते.

सर्व बंदरांचा विकास एकाच वेळीं करणें शक्य नाहीं. कारण बंदरांसाठी लागणाऱ्या सामानाच्या किंमती वाढल्या आहेत. त्यामुळें कांहीं निवडक अशा बंदरांच्या विकासाचीं कामें हातीं घेणें शक्य आहे. या किनाऱ्यावरील दोन किंवा तीन बंदरांचा विकास करून त्यांना आपण मध्यम प्रतीच्या बंदरांचा दर्जा प्राप्त करून दिला व बाकीच्या बंदरांत अत्यंत आवश्यक असलेल्या थोड्या सोयी जरी उपलब्ध करून दिल्या तरी या बाबतींत आपण चांगली कामगिरी बजावली असें होईल. या उद्देशानें सरकारनें गेल्या वर्षीच्या कोंकण विकासाच्या १ कोटी रु. कर्जाच्या कार्यक्रमाखाली ४० लक्ष रु. ची जादा तरतूद केली होती.

दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या अवधींत कार्यान्वित करण्यासाठी ६२ लक्ष रु. खर्चाचा एक खास जादा कार्यक्रम आंखण्यांत आला होता.

रत्नागिरी हें कोंकणचें महत्त्वाचें बंदर होय. अविकसित अवस्थेंत असतांनाहि या बंदरांत दररोज ५०० उतारूंची वाहतूक होत असते. बंदराच्या मानानें ही वाहातूक उल्लेखनीय असून सदर बंदरांतून प्रतिवर्षी २२,००० टन मालाचीहि वाहतूक होते. परंतु हें बारमाही बंदर नाहीं. पावसाळ्यांत जहाजांची वाहतूक बंद पडते. मुंबईच्या दक्षिणेस मंगलोरपर्यंत (गोवा प्रदेश सोडून) एकहि बारमाही बंदर नाहीं. रत्नागिरी बंदराला बारमाही बंदराचें स्वरूप प्राप्त करून देण्याबाबतच्या प्रश्नावर राज्य सरकार व भारत सरकार विचार करीत आहे.

बंदराच्या विकासाच्या कार्यक्रमानुसार मालवण येथील आर. सी. सी. धक्का व श्रीवर्धन येथील धक्क्याचें काम पूर्ण झालें असून त्या कामाचा उल्लेखनीय कार्यांमध्यें समावेश करतां येईल. एलिफंटा येथील धक्क्याचें बांधकाम, बोरिया येथील बोट धक्क्याचें बांधकाम, रत्नागिरी बंदरांत प्रवाशांना उतरण्याच्या सोयी उपलब्ध करण्याचें काम व रेवदंडा येथील निमुळत्या धक्क्याचें बांधकाम चालू आहे.

महाराष्ट्रांतील बंदरांच्या विकासार्थ पहिल्या पंचवार्षिक योजनेंत या कार्यासाठी ३ लक्ष रु. पेक्षा कमी खर्च करण्यांत आला होता. तर दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या पहिल्या तीन वर्षांच्या अवधींमध्यें ह्या कामासाठी ३० लक्ष रु. खर्च करण्यांत आला. भारत सरकारनें, मध्यम प्रतीच्या बंदरांची मोठ्या प्रमाणावर विकास करण्यासाठी योग्य बंदरांची शिफारस करण्यासाठी मध्यम प्रतीच्या बंदरांची, विकास समिति स्थापन केली आहे. यानुसार ह्या समितीनें आपल्या चौकशीच्या कार्यक्रमांत रत्नागिरी, रेडी, इत्यादि ठिकाणांना भेट दिली आहे व समितीचा अहवाल लवकरच बाहेर पडेल. तसेंच कोंकण किनाऱ्यावरील बोट वाहतुकीच्या संपूर्ण समस्येची चौकशी करण्यासाठींहि भारत सरकारनें एक समिति स्थापन केली आहे.

---

**पुण्याजवळ कठीण पोलादाचा कारखाना**—पुण्याजवळ कठीण पोलाद तयार करण्याचा कारखाना उभारण्याचा परवाना भारत सरकारनें एका स्वीडिश कंपनीला दिला आहे. कारखान्याच्या उभारणीसाठी ८० लाख रु. लागतील. कांहीं काळ कारखान्याचें काम स्वीडनचे एंजिनिअर्स पाहतील व हळुहळु भारतीय एंजिनिअर्स शिकवून तयार करतील.

## "बृहन्महाराष्ट्रा"ची प्रगति

दि बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लि. चे भागीदारांची पंचविसावी वार्षिक साधारण सभा शनिवार दि. १९ मार्च १९६० रोजीं सिंडिकेटचे अध्यक्ष श्री. शंकर लक्ष्मण लिमये, वकील, भोर, यांचे अध्यक्षतेखालीं भरली होती.

कंपनीचें वसूल भांडवल रु. २८ लक्षांचेवर असून एकूण रिझर्व्ह रु. ४२ लाखांचेवर गेला आहे. यंदाचे वर्षीं कंपनीस निव्वळ नफा ११ लाखांचेवर झाला असून कंपनीनें रजतमहोत्सवानिमित्त नेहमीचे १० टक्के डिव्हिडंड खेरीज जादा १० टक्के डिव्हिडंड ऑर्डिनरी शेअर्सवर जाहीर केलें आहे.

कंपनीनें यंदाचे वर्षीं आपल्या नोकरवर्गासाठीं रु. २ लाखांची बोनसची तरतूद व रु. १॥ लाखांची ग्रॅच्युइटीची तरतूद केली असून मोठ्या प्रमाणावर दूधपुरवठ्याची योजनाहि हातीं घेतली आहे. त्याचप्रमाणें श्रीपूर येथें अडीच लाख रुपये खर्चून शालागृह बांधण्याचीहि योजना केली आहे. त्याचप्रमाणें कामगारांकरितां राहण्यासाठीं चाळी बांधण्याची विस्तृत योजना हातीं घेतली आहे.

---

## सरकारी मालकीचा घड्याळांचा कारखाना

एका जपानी फर्मच्या सहकार्यानें उभारण्यांत यावयाच्या सरकारी मालकीच्या घड्याळांच्या कारखान्यांत संपूर्ण उत्पादन होऊं लागलें म्हणजे प्रतिवर्षीं १ ते १॥ कोटी रु. किंमतीच्या परकीय हुंडणावळीची बचत होऊं लागेल. या कारखान्यांत उत्पादनास १९६२ अखेर प्रारंभ होईल असा अंदाज आहे. तेथें तयार होणाऱ्या घड्याळांतील सुट्या भागांपैकी देशी भागांचें प्रमाण पहिल्या वर्षातील ५४ टक्क्यांवरून चौथ्या वर्षात ८४ टक्क्यांपर्यंत जाईल. या योजनेसाठीं सुमारें १ ते १·५ कोटी रु. चें भांडवल गुंतविण्यांत येईल. ह्यापैकी ७० लक्ष रु. परकीय चलनाच्या स्वरूपांत असतील व त्याचा विनियोग जपान व इतर राष्ट्रांतून यंत्रसामुग्री आयात करण्यासाठी केला जाईल. तेथें संपूर्ण उत्पादन सुरू झालें म्हणजे प्रतिवर्षीं ३·६ ते ४ लक्ष मनगटी घड्याळें तयार होतील, असा अंदाज आहे.

## चित्तरंजन येथील कारखान्याची प्रगति

चित्तरंजन येथील रेल्वे-एंजिनांच्या कारखान्यांत वाफेवर चालणारें रुंद रुळाचें १,००० वे एंजिन नुकतेंच तयार झालें आणि ते मध्य रेल्वेला वाहतुकीसाठीं देण्यांत आलें. ह्यावरून कारखान्याच्या प्रगतीची कल्पना येईल. हा कारखाना २६ जानेवारी १९५० पासून प्रत्यक्ष उत्पादन करूं लागला. त्याच वर्षाच्या नोव्हेंबरच्या १ तारखेला कारखान्यांत तयार झालेलें पहिलें एंजिन बाहेर पडलें. १९५०–५१ सालीं अवघीं ७ एंजिनें तयार होऊं शकलीं. १९५५–५६ सालीं त्यांची संख्या १२९ झाली आणि गेल्या वर्षीं १७३ एंजिनें तयार झालीं. दहा वर्षांपूर्वी ह्या कारखान्यांत एंजिनांच्या जुळणीचेंच काम मुख्यत: होत असे. पण दरम्यानच्या काळांत एंजिनांना लागणारे सर्व भाग कारखान्यांतच तयार होऊं लागले, आणि आतां कारखान्यांतील एंजिनांत वापरावे लागणारे ९० टक्के भाग भारतांतच तयार झालेले असतात. १९५४–५५ सालीं प्रत्येक एंजिनांत २·५ लाख रुपये किंमतीचे भाग परदेशांतून आयात केलेले वापरण्यांत येत असत. आतां अवघे ७०,००० रुपये किंमतीचे परदेशी भाग वापरण्यांत येत असतात. भारतामधील पोलादाचे तीन्ही कारखाने पूर्णपणें चालू झाले म्हणजे हें प्रमाण अगदींच बेताचे राहील ह्यांत शंका नाहीं. एंजिनांच्या संख्येंत वाढ झालेली आहे, त्याचप्रमाणें उत्पादनाची पद्धतहि सुधारली आहे. त्यामुळें एंजिनाच्या किंमतीहि कमी झाल्या आहेत. पहिल्या एंजिनाला ७·५ लाख रुपये खर्च आला होता. आतां प्रत्येक एंजिनाला सरासरी ४ लाख रुपये खर्च येतो. एंजिनांच्या बाबतींत भारत आतां स्वयंपूर्ण झाला आहे, इतकेंच नव्हे तर कांहीं थोडीं एंजिनें आतां निर्यात करतां येतील.

---

## डॉ. राजेंद्रप्रसाद ह्यांची नीरा–साखर–तुला

ताडगूळ कार्यकर्त्यांच्या परिषदेच्या ११ व्या अधिवेशनाचें उद्घाटन दि. २९ रोजीं डॉ. राजेंद्रप्रसाद ह्यांचे हस्तें दिल्ली येथें होईल. त्यावेळीं त्यांची नीरेपासून बनविलेल्या साखरेची तुला करण्यांत येईल.


# दि भारत इंडस्ट्रिअल बँक लि.

हेड ऑफिस — पुणें शहर

शाखा — पुणें लष्कर, बारामती, श्रीरामपूर, लोणावळा, खोपोली, ओझर.

— संचालक मंडळ —

श्री. के. पां. जोशी (अध्यक्ष). श्री. बी. बी. वाळवेकर, श्री. रा. म. गिरमे, श्री. न. प. केळकर.
श्री. का. म. महाजन (उपाध्यक्ष). सौ. इंदुमतीबाई फडके, श्री. रा. प्र. दामोदरे, श्री. एम. जे. पटेल.

एकूण खेळतें भांडवल रु. ९०,००,००० चे वर

सीझनमध्यें आकर्षक व्याजाचे दराने शॉर्टटर्म व कॉल डिपॉझिट स्वीकारलीं जातात. दराबद्दल चवकशी करावी.

मुख्य कचेरींत माफक भाड्यांत कांहीं सेफ डिपॉझिट लॉकर्स द्यावयाचे आहेत. गरजूंनीं चवकशी करावी.

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

रा. बा. साळवेकर
B. A., LL. B., मॅनेजर

## औद्योगिक उत्पादनांत ११ अंशांनीं वाढ

### एकूणात नव्या वस्तूंच्या उत्पादनास प्रारंभ

भारतांतील औद्योगिक उत्पादनाच्या निर्देशांकांत १९५९ मध्यें १९५८ पेक्षा ११·३ अंशांनीं वाढ झाली. म्हणजेच हें उत्पादन ८·१ टक्क्यांनीं अधिक आहे. सन १९५८ च्या औद्योगिक उत्पादनाचा निर्देशांक १३९·७ होता तर १९५९ मध्यें तो १५१·० वर गेल्याचें औद्योगिक आंकडेवारी विभागानें नुकत्याच प्रसिद्ध केलेल्या आंकडेवारीवरून दिसून येतें. निर्देशांकांत झालेली ११·३ अंशांची ही वाढ, ही आतांपर्यंतच्या कोणत्याहि वर्षांत झालेल्या वाढीपेक्षा अधिक आहे.

किंमतीच्या प्रमाणांत उत्पादनाचा विचार करतां, कापड उद्योगधंद्यांतील उत्पादनाची किंमत वगळतां, १९५९ मध्यें (१९५७ च्या किंमती ह्या किंमती मूळ धरून) १,३५९·१२ कोटी रुपये किंमतीचा म्हणजे १९५६ (दुसऱ्या योजनेचें पहिलें वर्ष) पेक्षा ३० टक्क्यांनीं अधिक किंमतीचा माल तयार झाला.

सन १९५९ मध्यें ३१ नव्या वस्तूंचें उत्पादन सुरू झालें. या वस्तूंत शिवणाच्या यंत्रांच्या सुया, रॅडियल ड्रिलिंग मशीन, सायकली, मोटार सायकलींच्या आऱ्या तयार करणारीं यंत्रें, फोटो फ्लॅश लॅम्प, व्हिटॅमिन-'ए', व्हिटॅमिन 'बी'-१२, इत्यादींचा अंतर्भाव होतो.

भारतांतील विविध रसायनांच्यां उत्पादनांतहि, उल्लेखनीय वाढ झाली असून कॉस्टिक सोडा, सोडा ॲश, यांसारख्या महत्त्वाच्या रासायनिक पदार्थांच्या बाबतींत तर आपण जवळ जवळ स्वावलंबी झालों आहोंत. दुसऱ्या योजनेच्या सुरुवातीला १४९ कोटी रुपये किंमतीचीं रसायनें तयार झालीं होतीं तर १९५९ मध्यें २०९ कोटी रुपये किंमतीच्या रसायनांचें उत्पादन झालें.

औद्योगिक आणि इतर प्रकारची यंत्रसामुग्री व रेडिओ, विजेचे पंखे, विजेचे दिवे, यांसारखीं विजेचीं उपकरणीं व माल यांच्या उत्पादनांत वाढ झाली आहे.

सन १९५६ मध्यें औद्योगिक व इतर प्रकारच्या यंत्रसामग्रीच्या उत्पादनाची किंमत ३० कोटी रुपये भरली होती तर १९५९ मध्यें हा आंकडा ५४ कोटी रुपये वर गेला. १९५६ मध्यें उत्पादन झालेलीं विजेचीं उपकरणीं व माल यांची किंमत ५२ कोटी रुपये भरली होती. १९५९ मध्यें त्यांत ३५ टक्क्यांनीं वाढ होऊन ती ७० कोटी रुपयांवर गेली.

मोटारी धरून १९५९ मध्यें एकूण ८३·४ कोटी रुपये किंमतीच्या वाहतुकीच्या किंवा दळणवळणाच्या साधनांचें उत्पादन झालें. १९५६ मधील हाच आंकडा ६७·८ कोटी रुपये होता. १९५९ मध्यें सुमारें १ कोटी सायकली तयार झाल्या.

१९५९ मध्यें लाईट इंजिनियरिंग मालाचें उत्पादन २६ कोटी रुपयांवर गेलें. एअर कंडिशनर, मोजमापाचीं शास्त्रीय उपकरणीं, टाईप-रायटर, पोलादी कानशी, इत्यादि ह्या गटांत मोडणाऱ्या मालाच्या उत्पादनांतहि वाढ झाली.

खाणी, धातू आणि धातूंच्या विविध वस्तू यांच्या उत्पादनांत वाढ होऊन १९५६ मधील २३६ कोटी रु. वरून १९५९ मध्यें तें ३२३·५ कोटी रु. वर गेलें.

संकीर्ण गटांत १९५६ मध्यें ४८८ कोटी रुपये किंमतीचें उत्पादन झालें होतें तें १९५९ मध्यें ५९४ कोटी रुपयांवर गेलें.


# बँक ऑफ पूना, लिमिटेड

(शेड्यूल्ड बँक)

अधिकृत भांडवल ... रु. ५०,००,०००
विक्रीस काढलेलें व खपलेलें भांडवल रु. १५,००,०००
वसूल भांडवल ... रु. ११,५०,०००

—: संचालक मंडळ :—

१. श्री. दत्तात्रय रामचंद्र नाईक, चेअरमन
२. डॉ. ना. भि. परुळेकर, व्हाईस चेअरमन (संचालक, सकाळ)
३. श्री. फ्रामजी पी. पोचा
४. श्री. गणपतराव काळुराम नाईक, B. Sc., B. E., LL. B.

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.
अल्प मुदत ठेवीवर आकर्षक व्याज.

...शाखा...
पुणें (१) सदाशिव पेठ, (२) डेक्कन जिमखाना (३) सांगली.

हेड ऑफिस व सांगली शाखेंत अल्प भाड्यांत लॉकरची सोय.

मुख्य ऑफिस : ४५५ रविवार पेठ, पुणें
गो. गं. साठे मॅनेजर

# दि बॉम्बे स्टेट को-ऑपरेटिव्ह बँक लि., मुंबई

९, बेक हाऊस लेन, फोर्ट, मुंबई-१.
(स्थापना : १९११)

चेअरमन : श्री. रमणलाल जी. सरैय्या, ओ. बी. ई.

ह्या बँकेंत गुंतविलेला पैका हिंदी शेतकरी व सहकारी संस्था ह्यांना साहाय्यकारक होतो.

भरपाई झालेलें भाग भांडवल :
भागीदारांतर्फे रु. ४४ लक्ष
मुंबई सरकारतर्फे रु. ८१ लक्ष
रु. १ कोटी, २५ लक्ष

गंगाजळी व इतर फंड : रु. ५३ लक्ष
एकूण ठेवी : रु. १२ कोटी
खेळतें भांडवल : रु. २४ कोटींचे वर

१० जिल्ह्यांमध्यें व मुंबई उपनगरांत मिळून ४३ शाखा

भारतांतील सर्व प्रमुख शहरीं कलेक्शनची व्यवस्था. सर्व तऱ्हेचीं बँकिंगचीं कामें केलीं जातात. सर्व प्रकारच्या ठेवी स्वीकारल्या जातात. शर्तीबद्दल चौकशी करावी.

जी. एम्. लाड
मॅनेजिंग डायरेक्टर.


हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास' ८२१ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.